# ए आय (कृत्रिम बुध्दीमत्ता)

गरज बनूनी मानवाची
कवेत घेतले जगसारे
नव उधाण तंत्राचे
युग कृत्रिम बुद्धीचे

काम त्याचे चळप–चालाकी
दाहीदिशा दक्ष, ख्याती नभापरी
सर्वत्र भेटे पावलो–पावली
झेप विज्ञानाची, कल्पनेच्या परी

अर्थाचा वाटाड्या बनला
विद्येत, कलेत, रक्षणात
सामावून स्वताला साऱ्यात
दंग बालवृद्ध खेळात

रूप अदृश्य धारिले
जणू माहितीचा नवा आरसा
स्वरूप नीट जाणून
चालवावा शोधाचा वारसा

तंत्र आले भयासवे ज्याने
बुडेल का श्रेय कलेचे ?
संपेल का नवनिर्मिती ?
फुटेल का अंकुर बुद्धीचे ?

◆

**राघवेंद्र गीता वंजारी**
मोबा.नं.: ९०२८७६९१८२

# मुळाची हाक..!

कळ्या पाकळ्यांचे गंध सुगंध
सांगून जातात मुळाची मजबूती
तेव्हा फुलून जातं मुळाचं चित्र
खोल आत.. मनात
झाडावरची ताजी हिरवाई
सांगून जाते मुळाची ख्याली खुशाली
तेव्हा आश्वस्त होते आतली माती
उडून जात नाही सहज.
खोडावरची भक्कम नक्षी
सांगून जाते मुळाचं सामर्थ्य, खोली
मातीखालचे प्रवाह
तेव्हा ऐकू येतात खळाळताना
मुळाची संवेदना जागून येते काळजात
रक्त अधिक लाल होतं
आणि मन होतं हिरवं
पण सारीकडून येणारी.. खुणावणारी..
मुळाची हाक
ऐकतो कोण ?

◆

**पार्थ जोशी**
मोबा. ९७६६५३९४७९